

## कनकापूरला अंगणवाडी सेविकांचा सत्कार

**देवळा :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कनकापूर/कांचने येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी करण्यात आली. अंगणवाडी सेविका द्वारकाबाई शिंदे, बचत गटाच्या सुरेखा शिंदे आदी महिलांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी सरपंच बारकू वाघ, उपसरपंच जगदीश शिंदे, ग्रामसेविका जयश्री भामरे, सदस्य बिजला बर्डे, जिजाबाई मोरे आदींसह हिरामण बच्छाव, बापू शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील खर्डे ,शेरी, वार्शी ग्रामपंचायत कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अंगणवाडी सेविका,मदतनीस, आशा वर्कर आदी महिलांचा सत्कार करण्यात आला.

# कळवण तालुक्यातील अवकाळी पंचनाम्यांचा अहवाल सादर

◆ **कळवण (प्रतिनिधी) :**

वादळी वारे, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे कळवण तालुक्यांमधील ९२ गावांमधील ९४६ शेतकऱ्यांच्या ३७८.२५ हेक्टरवरील क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. आमदार नितीन पवार यांच्या मागणीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या निर्देशांनुसार महसूल, कृषी विभागाने नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून शासनस्तरावर १ कोटी २ लाख ११ हजार ४१० रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने शासनस्तरावर सादर केला आहे.

एप्रिलपाठोपाठ मे महिन्यामध्ये अवकाळी पावसाचा तडाखा शेतकऱ्यांना बसला. ६ ते १४ मेदरम्यान तालुक्याच्या ग्रामीण व आदिवासी भागात दाणादाण उडाली. काठरे दिगर, सुपले दिगर, खर्डेदिगर, पुनंदनगर, शिरसमणी, एकलहरे, नाकोडे, बेज, कोसवण, खिराड, मोहपाडा, तिऱ्हळ खुर्द, सरलेदिगर, मळगाव खुर्द, पिंपळे बु, दरेभणगी, भैताणेदिगर, कोसुर्डे, जामले हतगड, चाफापाडा येथील घरांचे पत्रे, कांदा चाळीचे पत्रे, भिंत पडून घराचे तसेच बैल गोठा, हॉटेल व घरांचे ९८ ठिकाणी नुकसान झाले होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कळवण दौऱ्यात नुकसानीची माहिती दिली होती. त्यांनी तत्काळ जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून अहवाल शासनस्तरावर पाठविण्याच्या सूचना केल्याने अहवाल सादर झाला आहे.

**- नितीन पवार,** आमदार

मे महिन्यात अवकाळी पावसामुळे तालुक्यातील ९२ गावांतील ३७८.२५ हेक्टर क्षेत्र बाधित होऊन ९४६ शेतकऱ्याच्या शेतीपिकांचे नुकसान झाले. ९८ ठिकाणी घर व कांदा चाळीचे नुकसान झाले आहे. मदतीसाठी नुकसानीचा अहवाल सादर केला आहे.

**- रोहिदास वारुळे,** तहसीलदार कळवण

### कांद्याचे ३२६ हेक्टर क्षेत्रात नुकसान

अवकाळी पावसामुळे सुमारे ३७८ हेक्टरवरील उभे पीक, भाजीपाला, आंबा, फळ बागा आणि काढणी करून ठेवलेला कांदा, मका यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. यात उन्हाळी कांदा लागवड क्षेत्र २८ हजार ७१६ हेक्टर कांद्याचे क्षेत्र असून, त्यात ३२६.५० हेक्टर क्षेत्रावरील शेतकरी वर्गाचे नुकसान झाले आहे

### नुकसान भरपाईसाठी लागणार १ कोटी रु.

महसूल, कृषी विभागाच्या संयुक्त अहवालनुसार फळपिके सोडून कोरडवाहू जिराईत पिकाखालील ३३ टक्क्यांवरील एका शेतकऱ्याचे ०.१० हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले असून, १३६० रुपयांची नुकसानभरपाई अपेक्षित आहे. फळपिके सोडून बागायत वार्षिक फळ पिकाखालील ९१ गावे बाधित झाले असून, ९४५ शेतकऱ्यांचे ३७८.१५ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे.

त्यात कांदा ३२६.५० हेक्टर, गहू ०.५० हेक्टर, २३.४५ हेक्टर बाजरी, ४.८० हेक्टर मिरची, ९.१० हेक्टर टोमॅटो, मका ०.२० हेक्टर, भाजीपाला १३. ६० हेक्टर नुकसान झाले.

## वेचक

### क्लासमेटची 'एज्युगेम्स इन्फिनिटी'

**नाशिक :** भारतातील आघाडीच्या नोटबुक आणि स्टेशनरी उत्पादन कंपनी असलेल्या 'आयटीसी'च्या 'क्लासमेट'ने 'एज्युगेम्स इन्फिनिटी' ही एक नावीन्यपूर्ण खेळांचा समावेश असलेली वही बाजारात दाखल केली आहे, ज्यामध्ये खेळ आणि शिक्षणाचे अखंड मिश्रण आहे. यामध्ये शिक्षणाचे भन्नाट अनुभवात रूपांतर करण्याच्या उद्देशाने एक मजेदार आणि आकर्षक उपक्रमही समाविष्ट करण्यात आले आहेत. 'एज्युगेम्स इन्फिनिटी' या अखेरच्या पानावरील कोडी परस्परसंवादी, खेळण्यायोग्य आणि फलदायी बनवून या संकल्पनेला एका नवीन आदर्शाकडे घेऊन जात आहे. यामध्ये विद्यार्थी वहीचे शेवटचे पान 'स्कॅन' करून दररोज एक नवीन भन्नाट खेळ खेळू शकतात. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी 'क्लासमेट' ३० शहरांमध्ये एक मोहीम राबवत आहे. नाशिक, मुंबई, जळगाव, नागपूर, कोल्हापूर, पुणे आणि सोलापूर ही शहरे स्पर्धेत सहभागी आहेत.

### पिंपळगावी पावसाने खंडित वीजपुरवठा सुरळीत

**पिंपळगाव बसवंत :** ६ जून रोजी पिंपळगाव उपविभागातील कोकणगाव शिवारात सायंकाळी जोरदार वादळी वारा पाऊस झाला. त्यात ३३ केव्ही कोकणगाव फिडरवर शिवारातील मोठे झाड पडून ३३ केव्ही फीडरचे दोन पोल जमीनदोस्त झाले. त्यामुळे कोकणगाव सबस्टेशनमधील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झालेला होता. परंतु, महावितरणचे अधिकारी, ठेकेदार व कर्मचारी जनमित्र यांच्या अतोनात प्रयत्नातून वीज पुरवठा रात्री तीन वाजता पूर्ववत करण्यात आला. सदर वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरण जनमित्रांसह वैष्णव इलेक्ट्रिकल, मल्हार इलेक्ट्रिकल व पार्थ इलेक्ट्रिकल्स या कंत्राटदाराच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी श्रम घेतले. महावितरण कंपनीचा वर्धापन सोहळा उत्साहात साजरा होत असतानाच आलेल्या आपत्कालीन परिस्थितीत ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी कार्यकारी अभियंता काळूमाळी, पिंपळगाव उपविभागाचे उमेश पाटील, कोकणगाव कक्षाचे क. अभियंता अरविंद पाटील, चंद्रशेखर निकम व साकोरा कक्षाचे सर्व जनमित्र उपस्थित होते.

### देवळा बसस्थानकातील स्वच्छतेबाबत समाधान



**देवळा :** हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे बस स्थानक स्वच्छता अभियानांतर्गत येथे नव्याने बांधण्यात आलेल्या बसस्थानकातील स्वच्छता व प्रवाशी सुविधांची पाहणी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक यामिनी जोशी यांनी भेट दिली.

यावेळी त्यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रवासी सुविधा, प्रसाधनगृह स्वच्छता आदींची पाहणी करून समाधान व्यक्त केले. सटाणा आगारप्रमुख राजेंद्र अहिरे यांनी बसस्थानकातील विविध सुविधांबाबत माहिती दिली. जोशी यांनी आगारप्रमुखांना बसस्थानकातील प्लॅटफार्मची संख्या वाढवण्याची सूचना केली. यावेळी देवळा वाहतूक नियंत्रक भूषण आहेर, संजय खैरे, आर. के. चव्हाण, सुभाष आढाव, एच. बी. कोठावदे, तसेच स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

### वृद्ध महिलेचा शेततळ्यात बुडून मृत्यू

**चांदवड :** तालुक्यातील शेलू येथील परशराम गोपाळा जाधव यांच्या पत्नी सुशीला परशराम जाधव (६५) या त्यांच्या शेततळ्यातील पाणी बघण्यासाठी गेल्या असता त्या पाण्यात पडल्या. बेशुद्ध झाल्याने त्यांना उपचारासाठी चांदवड उपजिल्हा रुग्णालय येथे आणण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. दीपक जाधव यांच्या माहितीच्या आधारे वडनेर भैरव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# देवमामलेदारांच्या पवित्र भूमीत मविप्र होरायझन अॅकॅडमी सुरू : अॅड. नितीन ठाकरे

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**




देवमामलेदार यशवंतराव महाराज यांच्या पवित्र भूमीत मविप्र सटाणा होरायझन अकॅडमी सुरु करण्यात आली असून, येथील मुलांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार सीबीएसई पटर्न शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. शिक्षणाची परंपरा लाभलेल्या सटाणा-बागलाणवासियांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण करण्यात आल्याचा आम्हाला आनंद आहे, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे यांनी केले. मविप्र होरायझन अकॅडमी (सीबीएसई), सटाणा या नवीन शाखेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे चिटणीस दिलीप दळवी होते.

याप्रसंगी मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, संचालक डॉ. सयाजीराव गायकवाड, शिवाजी गडाख, अमित बोरसे, डॉ. प्रसाद सोनवणे, रमेशचंद्र बच्छाव, विजय पगार, शालनताई सोनवणे, सेवक संचालक डॉ. संजय शिंदे, चंद्रजित शिंदे, जगन्नाथ निंबाळकर तसेच शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, प्रा. दौलत जाधव, डॉ. अजित मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनी होरायझन अकॅडमी सटाणाच्या स्थापनेमागील उद्देश आणि बागलाणातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज अधोरेखित केली. सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनीही आपल्या विचारांमधून संस्थेची शैक्षणिक दिशा स्पष्ट केली. चिटणीस दिलीप दळवी यांनी बागलाणवासियांच्या शैक्षणिक अपेक्षा आणि नव्या अभ्यासक्रमांच्या गरजा मांडत होरायझन अकॅडमी सटाणाचे स्वागत केले. सीबीएससी पॅटर्नमुळे बागलाणमध्ये विद्यार्थ्यांना नवीन दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्य अतिथी अॅड. नितीन ठाकरे यांनी संस्थेच्या शैक्षणिक दृष्टीकोन, सभासदांसाठी राबवले जाणारे लाभदायी धोरणे, आणि संस्थेच्या भावी योजना याविषयी मार्गदर्शन केले. होरायझन अकॅडमी, सटाणा या नव्या उपक्रमासाठी शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांचे सातत्यपूर्ण परिश्रम विशेष उल्लेखनीय ठरले.

या सोहळ्यास सटाणा सिनियर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. कृष्णा गायकवाड, सटाणा आयटीआयचे प्राचार्य किशोर भामरे, प्राचार्या वैशाली सोनवणे, निधी मिश्रा, नेहा सोनवणे, श्रुती देशमुख, दीप्ती पटेल, नायर, ढिकले, भामरे, संगीता सोनवणे तसेच सर्व विभागीय प्राचार्य, स्थानिक समिती सदस्य, सभासद, इंजिनिअर राहुल जाधव आणि प्रशांत जाधव, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते. सारिका कदम यांनी सूत्रसंचालन केले तर सटाणा होरायझन अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. योगिता भामरे यांनी आभार मानले.

### नव्या पिढीचे भविष्य

होरायझन अकॅडमी, सटाणा ही नवीन शाखा बागलाणच्या शैक्षणिक नकाशावर एक नवे तेजस्वी पर्व ठरेल. हा सोहळा बागलाणातील शिक्षणासाठी एक नवा क्षितिज उदयोत्सव होता, ज्यातून येत्या काळात नव्या पिढीचे उज्ज्वल भविष्य घडवण्यास निश्चितच बळ मिळेल, असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

# मुंबईला जाण्यासाठी दुहेरी टोलमधून मुक्ती मिळावी

### महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांची मागणी

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

मुंबईला जाण्यासाठी दुहेरी टोल द्यावा लागत आहे. या दुहेरी टोलमधून एकच टोल घेण्यात यावा किंवा घोटी येथे घेतला जाणारा १४० रुपये टोल २५ रुपये करण्यात यावा. किंवा समृद्धी महामार्गावरील घोटी ते ठाण्यापर्यंतची टोलची रक्कम कमी करण्यात यावी अशी मागणी केंद्रिय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरतर्फे उपाध्यक्ष संजय सोनवणे यांनी केली आहे. सदर पत्राची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे गुरुवार दि. ५ जुन २०२५ रोजी लोकार्पण झाले. इगतपुरी ते आमणे (ठाणे) असा हा ७६ किलोमीटरचा रस्ता आहे. समृध्दी महामार्गामुळे नागपूर ते मुंबई हे अंतर अवघ्या ८ तासात पार करता येणार आहे. हा मार्ग जेएनपीटी बंदराला जोडला जाईल तसेच नव्याने होणाऱ्या वाढवण बंदराला हि जोडण्याची योजना आहे. यामुळे महाराष्ट्राच्या एकूण अर्थव्यवस्थेला आणि विशेष करून दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्रामध्ये नाशिक हे वेगाने विकसित होणारे असे शहर आहे. समृध्दी महामार्गाने मुंबईला जाणे हे अवघ्या ३ तासात शक्य होणार आहे. नाशिकहून मोठ्या प्रमाणावर नाशवंत कृषीमाल व इतर उत्पादनांची निर्यात होत असते. या महामार्गामुळे कमी वेळात जेएनपीटी बंदराकडे माल वाहतूक होणार आहे. त्यामुळे वेळ आणि खर्चातील मोठी बचत सर्वांसाठी लाभदायक असणार आहे.

सध्या घोटी येथे टोल भरून जुन्या मार्गाने गोंदे ते वडपे पुढे जाता येते. ती टोलची रक्कम प्रवासी वाहनांसाठी १४० रुपये आहे. तर मालवाहतूक वाहनांसाठी ५०० हुन अधिक रक्कम द्यावी लागते. नवीन समृध्दी महामार्गाने गेल्यास टोलची ८० किलोमीटरसाठी २०० रुपये इतकी रक्कम आहे. तसेच मालवाहतूक वाहनांना ५०० रुपयांहून अधिक रक्कम द्यावी लागणार आहे. घोटी टोल नाका ते समृध्दी महामार्ग हे अंतर केवळ ३ -४ किलोमीटर असे आहे. त्यामुळे नाशिकहून समृद्धी मार्गे मुंबई अथवा जेपीटी येथे जायचे असेल तर डबल टोल टॅक्सचा भुर्दंड भरणे हे अन्यायकारक आहे.

# उमराणे येथे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा



◆ **देवळा (प्रतिनिधी) :**

उमराणे येथे जाणता राजा मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी राजे शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

उमराणे मावळखो-यातील जाणता राजा मित्र मंडळाच्या वतीने यावर्षीही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजीराजे शिवराज्याभिषेक दिना निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रथमता उमराणे वतनाचे दैवत श्री रामेश्वर महादेव मंदिरात श्री. ज्ञानेश्वर देवरे यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली तसेच स्वराज्याच्या भगव्या ध्वजाचे पूजन जिभाऊ देवरे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच शिव राजमुद्रेचे पूजन शरद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

छत्रपती शिवाजीराजे यांच्या प्रतिमेचे पूजन भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले दादाजी कारभारी देवरे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.त्यानंतर गाडगेबाबाचा आदर्श घेऊन उमराणे व परिसरातील नागरिकांसाठी रात्रदिवस सेवा करणारे जनसेवक बाबुराव देवरे यांचा संजय देवरे यांच्या हस्ते शिवचरित्र भेट देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनरक्षक अनिल पवार हे होते प्रमुख पाहुणे म्हणुन माजी सभापती धर्मा देवरे, माजी सरपंच मोतीराम देवरे, हिरामण देवरे, प्रल्हाद जमधाडे, केदा देवरे, दत्तु देवरे, विजय पगारे, अनिल पाटणी, पंडित देवरे, समाधान देवरे, डी.व्ही. देवरे, माणिक देवरे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी राजे यांचा आदर्श घेऊन जाणता राजा मंडळाने गावाच्या हितासाठी झटणा-या नागरिकांचा सन्मान करून गौरव करण्याचे वारसा अखंडपणे सुरु असल्याचा आम्हाला अभिमान आहे या मंडळाच्या कार्याचा तरुणांनी आदर्श घ्यावा असे आव्हान कार्यक्रमा प्रसंगी केले संदीप देवरे यांनी आभार मानले.

# नांदगाव बुद्रुक येथे तैवान पिंक पेरू बागेची लागवड

### बाजीराव निमसे यांचा एक एकरमध्ये प्रयोग

◆ **बेलगाव कुऱ्हे (प्रतिनिधी):**

निसर्गाच्या लहरीपणामुळे बळीराजाच्या डोळ्यात सतत अश्रू येतांना आपण सर्वत्र बघतो. पारंपरिक शेतीत घाम गाळूनही शेतकऱ्यांना उत्पन्न मिळत नाही. शेतीत चांगले उत्पादन मिळवण्यासाठी इगतपुरी तालुक्यातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करीत आहे. नांदगाव बुद्रुक शिवारात बाजीराव खंडू निमसे यांनी मोठ्या मेहनतीने एक एकरमध्ये ड्रीपच्या माध्यमातून तैवान पिंक पेरू बाग फुलवली आहे. मागच्या वर्षी त्यांनी छत्तीसगड, रायपूर येथून ११५० तैवान पेरूची रोपे आणून लागवड केली. ९ बाय पाच अंतर ठेवले असून बागेला लिक्विड खतांचा मारा करतात. पेरूच्या झाडांची उंची पाच फूट इतकी वाढली असून, लागवडीपासून दहा महिन्यात झाडाला फळे येतात.नांदूरनाका येथील शेतकरी संजय निमसे, भास्कर निमसे यांचा प्रयोग बघून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक माहिती घेत त्यांनी ही फळबाग लागवड करून उत्पन्नाचा मार्ग अवलंबला आहे. तैवान पिंक पेरू जाळीला बाजारात ६०० ते ७०० रुपये भाव मिळत असून नाशिकहुन हे पिंक पेरू पंजाबला विक्रीसाठी जातात. त्यांची पत्नी निर्मला शेतीत मदत करतात. यापूर्वी ह्या शेतीत श्री निमसे बागाईत पीक घेत मात्र त्यांनी तैवान पिंक पेरू लागवडीतून उत्पन्नाचा मार्ग निवडला. ही पेरू बाग वर्षभर सुरू राहत असल्याचे त्यांनी सांगितले.



# भगूर नगर परिषदेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिक बंदी जनजागृती मोहीम संपन्न

◆ **दे. कॅम्प (प्रतिनिधी) :**




जागतिक पर्यावरण दिन २०२५ च्या अंतर्गत Mission LiFE च्या मेरी लाइफ नुसार भगूर नगरपरिषद येथे मुख्याधिकारी सचिन कुमार पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिन २०२५ वृक्षारोपण सोहळा आणि प्लास्टिक बंदी जनजागृती मोहीम ५ जून २०२५ रोजी भगूर येथे राबविण्यात आले .

सदर कार्यक्रमात मा.मुख्याधिकारी सचिनकुमार पटेल यांनी उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी ,कर्मचारी ,महिला बचत गट सदस्य व नागरिक यांना मार्गदर्शन करताना सिंगल युज प्लास्टिक चा वापर न करता पर्यायी ज्यूट ,कापड पिशवी यांचा वापर करण्याचा तसेच पर्यावरणाला हानी होणार नाही याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले पर्यावरण संवर्धन साठी अधिकाधिक झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्याबाबत माहिती दिली .मुख्याधिकारी साहेब यांनी वृक्षारोपण करून भगूर शहरात विविध ठिकाणी भगूर शहरात झालेल्या वृक्षारोपणबाबत माहिती दिली .मुख्याधिकारी यांच्या सूचनेनुसार पर्यावरण संरक्षण व संवर्धन शपथ व माझी वसुंधरा शपथ घेण्यात आली तसेच पुनर्वापर होणार्या वस्तूंचा वापर करण्याचा सल्ला मुख्याधिकारी पटेल यांनी दिला व सर्वांना जागतिक पर्यावरणाच्या शुभेच्छा दिल्या .

सदर कार्यक्रमासाठी भगूर नगरपरिषद अधिकारी नगर अभियंता सिद्धेश मुळे, कार्यालय अधीक्षक,पल्लवी सूर्यवंशी ,सहाय्यक नगर रचनाकार रोशन उगले,पाणीपुरवठा अभियंता स्वप्नील मोकळ, पाणी पुरवठा अभियंता, संगणक अभियंता रोहित सुरसे, कर निर्धारण अधिकारी प्रवीण मराठे,कर निर्धारण अधिकारी गीतांजली मराडे ,सोनाली शिरसाठ,,लेखापरीक्षक निखील हंडोरे, प्रकल्प अधिकारी चित्रा भवरे व कर्मचारी परशुराम कुटे ,मंगल बागुल ,दिलीप वाघ ,रवी संसारे, ,प्रशांत गोजरे ,पूनम गवळी ,सूर्यभान झाल्टे ,संतोष कासार ,आरोग्य कर्मचारी ,महिला बचत गट सदस्य वपर्यावरण दूत उपस्थित होते.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, उक्तीचे आचरण ही काळाची गरज : प्राचार्य डॉ . ज्ञानोबा ढगे

◆ **पिंपळगाव बसवंत (प्रतिनिधी)**

विकास हा मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी आवश्यक असतो परंतु आपण ज्या पर्यावरणाच्या पायावर उभे आहोत त्याला बाधा होता कामा नये. वाढते औद्योगीकरण, बांधकामे,विविध शस्त्रास्त्रे चाचण्या, घरात दैनंदिन होणारा वाढता रासायनिक वस्तूंचा व प्लास्टिकचा वापर यामधून पर्यावरणावर विपरीत परिणाम होत पृथ्वीवर आपल्या नंतर मानवाच्या १०० पिढ्या आनंदाने नांदू शकतील असं वातावरण सांभाळणे ही आपल्या पिढीची महत्त्वाची जबाबदारी आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय येथे आयोजित वृक्षारोपण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. योगेश कडलग,प्रा. अभय वडघुले, प्रा. सुनील जाधव, प्रा.शंकर गायकवाड,श्रीमती सविता कापसे, शामल कुशारे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका रा.से.यो. आणि एन.सि. सी. चे विद्यार्थी आदी उपस्थित होते.



### निफाड महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण

पुढे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले की, निफाड महाविद्यालयात एक मूल तीस झाडे अभियान,घरच्या घरी रोपवाटिका घरोघरी रोपवाटिका,माझा वाढदिवस माझे झाड, आईच्या नावे एक झाड, नो प्लास्टिक आदी उपक्रम राबविले जात आहेत. महाविद्यालयात १०,००० रोपांची रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरू केलेले असून सर्व प्राध्यापक, सेवक व विद्यार्थ्यांनी यामध्ये कृतीयुक्त सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धन करण्यास हातभार लावत आहेत. याप्रंसगी महाविद्यालयीन आवारात वृक्षारोपण करण्यात आले. आणि पर्यावरण रक्षण व संवर्धन करणे विषयी सर्वांनी सामूहिक शपथ घेतली. या कामी महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.